## *Appendix XX (ii)*, (Vide Article - 20.03)

शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास 'राखीव वने'
म्हणून अधिसूचित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
शासन आदेश क्रमांक : एस-१०/२०१३/प्र.क्र.६४/फ-३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ जून, २०१३.

**वाचा :-**

शासन निर्णय क्रमांक : एस-१०/२०१३/प्र.क्र.६४/फ-३, दिनांक २५.६.२०१३.

रिट याचिका क्र. ३२४६/२००५ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ६.१०.२००५ च्या आदेशानुसार राज्यातील कांदळवनाचे व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धनासाठी प्रभावी पाऊले उचलण्याचे निदेश दिले होते. त्यानुषंगाने शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास भारतीय वन अधिनियम, १९२७ अनुसार संरक्षित वन म्हणून अधिसूचित करण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे.

२. राज्यात कांदळवन क्षेत्राची व्याप्ती, कांदळवनांचे पर्यावरणीय महत्व, सुनामी, तुफान तसेच चक्रीवादळ सारख्या नैसर्गिक आपत्तीपासून बचाव करण्यासंदर्भात कांदळवनाचे महत्व इत्यादी विचारात घेता, शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास पुरेसे वैधानिक संरक्षण प्रदान करण्याच्या दृष्टीने त्यास राखीव वने म्हणून गठीत करण्याबाबत उक्त नमूद शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यास अनुलक्षून पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

अ. आतापर्यंत संरक्षित वन म्हणून अधिसूचित झालेल्या सर्व कांदळवन क्षेत्रास राखीव वने म्हणून गठीत करण्याच्या दृष्टीने भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ४ अनुसार अधिसूचना निर्गमित करावी.

ब. संरक्षित वनक्षेत्रास भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ४ अनुसार अधिसूचित करण्याकरिता आवश्यक प्रारुप शासन परिपत्रक क्र.एफएलडी-१२/२०११/प्र.क्र.४१२/फ-३, दिनांक २९ मार्च, २०१२ अन्वये विहित करण्यात आलेला असून (प्रत संलग्न) त्यानुसार अधिसूचना निर्गमित होतील, याची दक्षता घ्यावी.

क. यापुढे शासकीय जमिनीवरील कांदळवन क्षेत्रास संरक्षित वनाऐवजी 'राखीव वने' म्हणून अधिसूचित करण्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर होतील, याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(प्रवीण परदेशी)
प्रधान सचिव (वने)

प्रति,

विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.

(कृ.मा.प.)

प्रतिलिपी :-

१) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३) सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
५) आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई.
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
८) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११) अपर मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई.
१२) पोलीस आयुक्त, मुंबई.
१३) आयुक्त, ठाणे महानगर पालिका, ठाणे.
१४) आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगर पालिका, कल्याण.
१५) आयुक्त, नवी मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई.
१६) आयुक्त, मिरा-भाईंदर महानगर पालिका, भाईंदर.
१७) आयुक्त, भिवंडी महानगर पालिका, भिवंडी.
१८) आयुक्त, उल्हासनगर महानगर पालिका, उल्हासनगर.
१९) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.
२०) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रा-कुर्ला संकुल, मुंबई.
२१) जिल्हाधिकारी, मुंबई / मुंबई उपनगर / ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
२२) पोलीस अधिक्षक, ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
२३) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) / सर्व वनसंरक्षक (प्रादेशिक)/ सर्व संबंधित उपवनसंरक्षक.
२४) संचालक, एम.आर.एस.ए.सी., नागपूर.
२५) अधिक्षक भूमी अभिलेख (ठाणे /रत्नागिरी / रायगड / सिंधुदुर्ग.)
२६) सर्व कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२
२७) फ-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. (निवडनस्ती).

402